दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : २२४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, बुधवार, दि.२६ मार्च २०२५




## थोडक्यात

### पवईत शास्त्रज्ञ महिलेवर पाळीव कुत्र्यांचा हल्ला

**दि.२५, मुंबई :** पवई येथे राहणाऱ्या शास्त्रज्ञ महिलेवर दोन पाळीव कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना घडली. या हल्लयांत गंभीर जखमी झालेल्या महिलेला नाकाच्या पुनर्रचनेसाठी शस्त्रक्रिया करावी लागली. पवई पोलिसांनी रविवारी कुत्र्याच्या मालकासह त्यांची देखभाल करणारे आणि घरकाम करणाऱ्या महिलेविरोधात निष्काळजीपणाच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला. घटना घडली त्यावेळी कुत्र्यांचा मालक परदेशात होता. जखमी महिला रिचा संचित कौशिक-अरोरा या पवई येथील जलवायू विहार सेक्टर ए येथे राहतात. त्या एका खासगी कंपनी शास्त्रज्ञ म्हणून काम करतात. त्या आपल्या नवीन सदनिकेच्या बांधकामाची पाहणी करण्यासाठी शनिवारी सकाळी एफ-ब्लॉककडे जात होत्या. रिचा इमारतीबाहेर पडताच मोटरगाडीतून दोन कुत्रे बाहेर आले. त्यांच्यासोबत कुत्र्यांची देखभाल करणारा अतुल सावंत आणि घरकाम करणारी स्वाती होती. कुत्र्यांचे मालक दिवेश विर्क कुटुंबासोबत बी-१२०३ सदनिकेतमध्ये राहतात. तक्रारीनुसार, स्वाती सांभाळत असलेल्या तपकिरी रंगाच्या कुत्र्याने अचानक शास्त्रज्ञ महिलेवर हल्ला केला. त्यांनी त्या श्वानाला दूर करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा चालक सावंत सांभाळत असलेला दुसरा (काळा) कुत्रा देखील तक्रारदार महिलेवर चाल करून आला. त्यांच्या हल्लयांतून बजाव करण्याच्या प्रयत्नात त्या मागे पडल्या. त्याच वेळी, लहान काळ्या कुत्र्याने माझ्या नाकाला आणि उजव्या मांडीला चावा घेतला, त्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली, असा आरोप रिचा अरोरा यांनी तक्रारीत केला आहे.

### बाह्यवळण मार्गावर प्रवासी बस कंटेनरवर आदळली

**दि.२५, पुणे :** प्रवासी वाहतूक करणारी भरधाव बस कंटेनरवर आदळल्याने दहा प्रवासी जखमी झाल्याची घटना मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर घडली. अपघातात बसचालक जखमी झाला असून, जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी बसचालकाविरुद्ध आंबेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी सदानंद महादेव खोत (वय ३०, रा. शिवनाकवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विश्वतेज अभिमन्यू जाधव (वय २३, रा. हडपसर) यांनी आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खासगी प्रवासी वाहतूक करणारी बस बाह्यवळण मार्गावरुन कोल्हापूरकडे निघाली होती. जांभुळवाडी परिसरात बसचालक खोत याचे नियंत्रण सुटले आणि बस कंटेनरवर आदळली. अपघातात बसचालक खोत याच्यासह दहा प्रवासी जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. जखमी चालकासह प्रवाशांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. पोलीस हवालदार पी.एन.कांबळे तपास करत आहेत.

### बोपदेव घाटात रिक्षाच्या दुचाकीस्वार दाम्पत्य जखमी

बोपदेव घाटात रिक्षाच्या धडकेत दुचाकीस्वार तरुण जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाबोधी महाविहार मुक्त करा, महामोर्चात भिख्खू व अनुयायांची एकमुखी मागणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नांदेड :** ज्या तत्वज्ञानाचा संपूर्ण जग जागरुकपणे अंगीकार करतेच, ते तत्वज्ञान विश्व शांतीदूत भगवान गौतम बुद्धांना बुद्धगया (बिहार राज्य) येथे प्राप्त झाले. ते ठिकाण बौद्ध भिख्खू आणि अनुयायांच्या स्वाधीन करावे तसेच महाराष्ट्रातील एका बौद्ध भिख्खुंची महाबोधी महाविहार ट्रस्टमध्ये प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करावी, या मागणीसाठी नांदेड येथे मंगळवारी (दि. २५) महामोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व भंतेजींनी केले.

बिहार राज्यातील बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्ध धर्मियांचे पवित्र स्थळ आहे; परंतु बुद्धगया मंदिर कायदा १९४९ अधिनियम नुसार हा महाविहार बौद्धेतर धर्मियांच्या ताब्यात आहे. त्यामुळे येथे बुद्धाच्या तत्वज्ञानाची अवहेलना होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. हा महाविहार अन्य धर्मियांच्या ताब्यातून मुक्त करत ते पवित्र ठिकाण बौद्ध भिख्खू तसेच बौद्ध अनुयायांच्या स्वाधीन करावे. तेथील ट्रस्टवर महाराष्ट्रातील एका भिख्खुची प्रतिनिधी



म्हणून निवड करावी, या मागणीसाठी नांदेडमध्ये मंगळवारी महामोर्चा संपन्न झाला.मंत्री जयकुमार रावल यांनी दिले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर बौद्ध अनुयायी एकत्र आले. तिथून व्हीआयपी रोड मार्गे आयटीआय-शिवाजीनगर-कलामंदिर, शिवाजी पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय इथपर्यंत हा मोर्चा गेला. यावेळी हजारो बौद्ध अनुयायी भिख्खुंच्या नेतृत्वाखाली या मोर्चात सहभागी झाले होते. मार्च महिना असूनही ऊन मात्र प्रचंड असून या उन्हात मोर्चेकऱ्यांसाठी थंड पाणी व फराळाची व्यवस्था मोर्चाच्या मार्गावर विविध संघटनांच्यावतीने करण्यात आली होती. तळपत्या उन्हात हजारो अनुयायी सहभागी झाल्याने रस्ता फुलून गेला होता. जिल्हाधिकारी कार्यालयात भिख्खुंच्या हस्ते एक सविस्तर निवेदन देण्यात आले. त्यात वरील विषय व बुद्धगया येथे बुद्धांच्या तत्वज्ञानाच्या विरुद्ध सुरु असलेल्या प्रकाराचा सविस्तर उहापोह करुन बौद्धांचे हे धार्मिक स्थळ बौद्धांच्या हवाली करण्यात यावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली. हे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देशाचे गृहमंत्री, बिहारचे राज्यपाल तसेच युनेस्कोचे चेअरमन यांना देण्यात आले आहे. या मोर्चात बौद्ध भिख्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते व सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

वरील मागणीसाठी मागील आठ दिवसांत जिल्ह्यात ठिकठिकाणी मोर्चे काढण्यात आले व तहसील कार्यालयांमध्ये निवेदने देण्यात आली. मंगळवारी नांदेडमध्ये निघालेल्या मोर्चात जिल्हाभरातील बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले. रणरणत्या उन्हात निघालेल्या या मोर्चामुळे काही काळ वाहतूक व्यवस्थेवर ताण पडला. मोर्चादरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

## अ‍ॅथलेटिक्समध्ये महाराष्ट्राची प्रथमच २३ पदकांची लयलूट, ईश्वरचा सुवर्ण वेध

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नवी दिल्ली :** खेलो इंडिया पॅरा स्पर्धेतील अ‍ॅथलेटिक्समध्ये महाराष्ट्राच्या क्रीडापटूंनी १० सुवर्णांसह एकूण २३ पदकांची लयलूट करीत दमदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले.महाराष्ट्रासाठी दहावे सुवर्णपदक पुण्याच्या ईश्वर टाक याने भालाफेक प्रकारात पटकावले.

जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये संपलेल्या अ‍ॅथलेटिक्सच्या मैदानात अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपल्या यशाचा झेंडा फडकविला.महाराष्ट्राने पॅरा स्पर्धेत प्रथमच १० सुवर्ण, ६ रौप्य व ७ कांस्यासह एकूण २३ पदकांची कमाई केली आहे.गतस्पर्धेत अ‍ॅथलेटिक्समध्ये ७ सुवर्णांसह एकूण १६ पदकांची कमाई केली होती. अकुताई



उनभगत, भाग्यश्री जाधव यांनी दुहेरी पदकाचा पराक्रम करीत अ‍ॅथलेटिक्सचे मैदान गाजवले.प्रथमच पॅरा स्पर्धेत खेळताना १२ खेळाडूंनी पदार्पणातच पदक जिंकण्याचा करिश्मा घडविला.दिल्ली दौर्यवर आलेले क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे,पथकप्रमुख मिलिंद दिक्षीत यांनी खेळाडूंचे कौतुक केले आहे.

अ‍ॅथलेटिक्सच्या एफ १२ या प्रकारात २५ वर्षीय ईश्वरने ६२.६६ मीटर अंतरावर भाला फेकत सुवर्णपदकावर नाव कोरले. भालाफेकमध्येच एफ १३ या प्रकारात महाराष्ट्राच्या प्रतीक पाटील याने कांस्यपदक मिळवले.त्याने ४९.०१ मीटर कामगिरी नोंदवली.ईश्वराचा उजवा डोळा पूर्णपणे निकामी असून त्याच्या डाव्या डोळ्याचीही ५० टक्के दृष्टी गेलेली आहे.येत्या काळात वर्ल्ड चॅम्पियनशिपची तयारी करणार असल्याचे त्याने सांगितले.

कोल्हापूरच्या स्नेहल बेनाडे हिने महिलांच्या गोळाफेकमध्ये एफ १२/१३ प्रकारात महाराष्ट्रासाठी रौप्यपदक जिंकले.तिने ७.४० मीटर अंतरावर गोळा फेकला.२० वर्षीय स्नेहल सध्या गोवा येथे आय आय टी मध्ये अभियांत्रिकीच्या दुसर्या वर्षाला शिकत आहे. स्नेहल तीन वर्षांची होती तेव्हा भावासोबत खेळत होती.हातातील बांगडी क्रशरमध्ये गेली म्हणून ती काढण्याचा नादात स्नेहलने आपला डावा हात गमावला.दीड वर्षापूर्वीपासून तिने गोळाफेक करायला सुरुवात केली.खेळ आणि करिअर दोन्ही सुरू ठेवण्याचा मानस तिने व्यक्त केला.

महिलांच्या एफ ५६ प्रकारात मीना पिंगाने हिने १७.०३ मीटर थाळीफेक करत तिसरे स्थान मिळवले.राजश्री कासदेकर हिने भालाफेकमध्ये एफ १२,१३ प्रकारात २०.२४ मीटर कामगिरीसह कांस्यपदक प्राप्त केले.

## जहाल नक्षल नेता मुरलीसह तिघांना कंठस्नान, छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलाला मोठे यश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, गडचिरोली :** छत्तीसगडच्या दंतेवाडात झालेल्या चकमकीत जहाल नक्षल नेता मुरलीसह तीन नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे. २५ मार्च रोजी ही चकमक उडाली. यात २५ लाखांचे इनाम असलेला जहाल नक्षलवादी व दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी सदस्य सोनासाई उर्फ सुधीर उर्फ मुरली उर्फ रामसाई (६२)याचा समावेश आहे. नक्षल चळवळीत पदार्पण केल्यानंतर सुरुवातीला पाच वर्षे तो गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय होता. चकमकीत तो ठार झाल्याने नक्षलवादी वादी चळवळीला धक्का बसला आहे.

दंतेवाडा व बिजापूर जिल्ह्यांच्या सीमेवरील गिरसापारा, नेलगोडा, बोडगा व इकेली या भागात काही नक्षलवाद्यांचा वावर असल्याची माहिती



मिळाल्यावरुन सुरक्षा दलातील राखीव पोलीस जवान (डीआरजी), स्फोटकविरोधी पथकाने दंतेवाडाचे पोलीस अधीक्षक गौरव राय यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षलविरोधी अभियान हाती घेतले होते.

२५ मार्च रोजी सकाळी आठ वाजता गिदम पोलीस ठाण्याच्या हद्दीत अभियानादरम्यान नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार सुरु केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. चकमकीत जहाल नक्षलवादी मुरलीसह अन्य दोन नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले. अन्य दोघांची ओळख पटविण्याचे काम सुरु आहे. यानंतर परिसरात नक्षलविरोधी अभियान गतिमान केल्याची माहिती दंतेवाडाचे उप पोलीस महानिरीक्षक कमलोचन कश्यप यांनी दिली. घटनास्थळी १२ बोअर रायफल, इंसास रायफल, घातक स्फोटक असा शस्त्रसाठा आढळून आला. याशिवाय दैनंदिन गरजेच्या वस्तूही आढळून आल्या. शस्त्रांसह सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. बस्तर परिक्षेत्रात २०२५ मध्ये आतापर्यंत तीन महिन्यांत वेगवेगळ्या चकमकींमध्ये शंभर नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा जवानांना यश आले.

### ‘मुरली’ची सुरवात गडचिरोलीतून

सोनासाई उर्फ मुरली हा मूळचा तेलंगणा राज्यातील वारंगल जिल्ह्यातील रहिवासी होता. अहेरी दलममध्ये १९९५ ते १९९७ पर्यंत त्याने काम केले, त्यानंतर १९९७ ते १९९९ पर्यंत तो पेरिमिली दलममध्ये सक्रिय होता. पुढे त्याने गडचिरोली जिल्हा सोडला व आपला मुक्काम अबुजमाडमध्ये हलविला. तेथून त्याने हिंसक कारवाया केल्या. सुरुवातीला तो चळवळीत नवीन भरती झालेल्या सदस्यांना प्रशिक्षण देत असे, त्याच दरम्यान त्यास डीव्हीसीएम म्हणून बढती मिळाली. मात्र, एका महिला नक्षल्याच्या तक्रारीनंतर त्यास पदावनत केले. त्यानंतर तो इंद्रावती क्षेत्रात एसीएम म्हणून काम करत राहिला. सध्या तो दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी सदस्य होता.

## शिवसेना शिंदे गटाच्या वतीने कामरा यांच्या प्रतिमेला कासा येथे काळे फासले...

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२५, डहाणू (पालघर) :** स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी त्यांच्या एका कार्यक्रमात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंग्यात्मक कविता सादर केली होती, ज्यामध्ये त्यांनी अप्रत्यक्षपणे ‘गद्दार’ असा उल्लेख केला होता. या घटनेनंतर राज्यभर शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्त्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. मुंबईतील खार परिसरातील ‘द यूनिकॉन्टिनेंटल’ हॉटेलमध्ये, जिथे कामरा यांच्या शोची शूटिंग झाली होती, तेथे शिवसैनिकांनी तोडफोड केली.

पालघर जिल्ह्यातील कासा येथेही शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्त्यांनी कामरा यांच्या विरोधात निदर्शने केली. त्यांनी कामरा यांच्या बॅनरला काळे




फासले आणि त्यांच्या कृत्याचा निषेध केला. शिवसेना नेते शीतल म्हात्रे यांनी चेतावणी दिली की अशा प्रकारचे वर्तन सहन केले जाणार नाही.


या प्रकरणानंतर, शिवसेना (शिंदे गट) नेते मुरजी पटेल यांनी कामरा यांच्या विरोधात एफआयआर दाखल केला आहे. त्यांनी कामरा यांनी दोन दिवसांच्या आत माफी मागावी, अन्यथा शिवसैनिक त्यांना मुंबईत मोकळेपणाने फिरू देणार नाहीत आणि त्यांचे तोंड काळे करतील, अशी धमकी दिली आहे. याचे पडसाद पालघर च्या ग्रामीण भागात ही पाहायला मिळाले, मंगळवारी कासा येथे डहाणू तालुका शिवसेना च्या वतीने बॅनर बाजी करत कामरा विरोधात जोरदार घोषणाबाजी करत, त्यांच्या फोटो ला काळे फासत बॅनर ही पेटवण्यात आले. तालुका प्रमुख संतोष देशमुख, विधानसभा अध्यक्ष हितेश पाटील, शहर प्रमुख रघु गायकवाड, विभाग प्रमुखराजकुमार गिरी, उपतालुका प्रमुख राजेश कासट, आकाश वावरे, सुमित गिरी, अतुल नाईक, सुधीर घाटाल, एकनाथ सोनकळे व इतर शिवसैनिक उपस्थिती होते. मात्र या संपूर्ण प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे, आणि पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष आहे.




## भारत आनंदी का नाही?

२० मार्च हा दिवस जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक सर्व्हे केला जातो. संपत्ती, आरोग्या बरोबरच परस्परंवरील विश्वास, ऋणानुबंध, करुणा या निकषांच्या आधारावर हे सर्व्हेक्षण केले जाते. वरील निकषांचा विचार करून यावर्षीही या संस्थेने जगातील १४७ देशांचा सर्व्हे करून एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात या संस्थेने जगातील सर्वाधिक आनंदी देशांची यादी प्रसिद्ध केली. या यादीतील पहिल्या वीस देशांमध्ये युरोपातील देशांचे वर्चस्व आहे. गेल्या अनेक वर्षापासून युद्धाच्या आगीत होरपळणारा इस्राईल हा देश आनंदी देशांच्या यादीत आठव्या स्थानी आहे. सतत युद्धाच्या छायेत राहूनही इस्रायली नागरिक आनंदी आहेत. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग आठव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४७ देशांच्या यादीत भारत ११८ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, नेपाळ, आणि चीन हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, नेपाळ आणि चीन यासारख्या देशात सध्या मोठया प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत इतकेच काय तर युद्धग्रस्त युक्रेन आणि पॅलेस्टाईन हे देशही भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत. आनंदी देशांच्या यादीत युक्रेन १११ व्या क्रमांकावर आहे तर पॅलेस्टाईन १०८ व्या क्रमांकावर आहे. जगातील गरीब, मागास आणि युद्धाच्या छायेत असणाऱ्या देशातील लोक आनंदी असताना भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेचीच बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग आठव्यांदा आनंदी देशाच्या यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावाचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि सम िनता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे सम िनता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचे असले तरीही. फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारतातही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.

# शिव्या दिल्या तर याद राखा !



महिला दिनाचे औचित्य साधून रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील पाचेरी या कोकणातल्या गावाने शिव्या बंदीचा ठराव केला आहे.शाळांमध्ये भांडताना किंवा चावडीवर गप्पा मारताना शिव्यांचा वापर गावात करता येणार नाही.मात्र आता गावामध्ये कुणीही शिवी दिली, तर त्याला चक्क ५०० रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. गावानं एकमुखानं तसा ठरावच केलाय...

मागील तीन महिन्या खाली सौंदळा (ता. नेवासा, जि. अहिल्यानगर ) या गावाने देखील शिव्यांवर बंदी घातली आहे ; त्यासाठी शिवीघाळ केल्यास ५०० रुपये दंड भरावा लागेल,असा ठराव या गावच्या ग्रामपंचायतीने देखील केला आहे. सौंदाळा गावात तर ठीक-ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांना ऑडिओही बसवण्यात आलाय. त्यामुळं कोणीही शिवी दिली तर लगेचच ग्रामपंचायतमधील कर्मचाऱ्यांना याची माहिती कळते. गावातील सलोखा राखण्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांना चांगले संस्कार देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे, असे तेथील गावकऱ्यांचे मत आहे. आता या गावांचे अनुकरण महाराष्ट्रातील इतर गावे करत आहेत. आई व बहिणीचा कुठलाही दोष नसताना शिवीगाळ करून अर्वाच्च शब्द वापरून स्त्री देहाचा अपमान केला जातो. अशी भावना ठराव करणाऱ्या गावातील ग्रामस्थ मांडत आहेत .

आई-बहिणीवरून शिव्या देणे ही एक सामान्य गोष्ट आज आपल्या समाज जीवनात बनली आहे. दुसऱ्या वरील संताप व्यक्त करण्यासाठी माणूस त्याला मारहाण करून 'शारीरिक हिंसा ' अथवा शिव्या देऊन समोरच्याची ' भावनिक हिंसा ' करण्याचा प्रयत्न करत असतो. खरंतर राग येणे ही एक मनोविकृतीच मानली जाते. मनासारखं घडत नसल्यास, समोरच्याने गैर कृत्य केल्यास राग अनावर होऊन माणूस हिंसक बनत असतो. आयुर्वेदामध्ये पित्त प्रवृत्तीचे लोक हे अति कोपिष्ट असल्याचे सांगितलं जातं. हे सार खरं असलं,तरी माणसाला स्वतःच्या रागावर नियंत्रण करता येतं हेही तितकंच खरं आहे. रागाच्या भरात काही जणांकडून गंभीर गुन्हा होतो; व पुढे त्याला आयुष्यभर त्याची किंमत मोजावी लागते. 'अति राग आणि भीक माग!' अशी वेळ अनेकांच्या बाबतीत आलेली आपल्याला दिसून येते. रागाच्या भरात माणूस समोरच्या व्यक्तीला त्याच्या आई-बहिणीवर गलिच्छ भाषेत शिव्या देतो.यातून फार मोठा संघर्ष निर्माण होतो. मारामारी होते, खून पडतात आणि कुटुंबच्या कुटुंब देशोधडीला लागतात.

मुलं ही मोठ्यांचे अनुकरण करत असतात. ती घरातील व समाजातील मोठी माणसं जशी वागतात, बोलतात तसंच ती करत असतात. मुलांना शाळेतील कविता लवकर पाठ होत नाहीत, परंतु सिनेमाची गाणी आणि शिव्या लवकर पाठ होतात. जर अख्ख्या गावातील वडीलधारी मंडळीच शिव्या देणं बंद करणार असतील तर आपसूकच तेथील भविष्यातील पिढीही खऱ्या अर्थाने सुसंस्कारी बनवणार आहे. या ठरावा सोबतच काही गावांनी 'बालकामगार मुक्त 'आणि 'बाल विवाह मुक्त' करण्याचा देखील निश्चय केला आहे. संध्याकाळी सात ते नऊ या वेळे दरम्यान शालेय विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरायचा नाही हा देखील ठराव काही गावानी केले आहेत. भविष्यात ही गावं भौतिक प्रगती बरोबरच सांस्कृतिक दृष्ट्या देखील वैभवशाली बनणार आहेत .

समोरच्या व्यक्तीच्या सन्मानावर आघात करण्यासाठी आणि त्याचा उपमर्द करण्यासाठी त्याच्या आई, बहिण आणि घरातील इतर स्त्रियावरून अश्लील भाषेत शिवीघाळ करण्याची असंस्कृत परंपरा अनेक वर्षापासून आपण जोपासत आलो आहोत. बदलत्या काळात मानव जातीला अपमानास्पद वाटणाऱ्या या जुन्या लांच्छनास्पद सामाजिक परंपरेला आता मुठमाती देण्याची वेळ आली आहे. ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागात देखील लोक अत्यंत गलिच्छ आणि अश्लील भाषेत चारचौघात शिव्या देताना दिसतात. एखादा व्यक्ती दहशत निर्माण करण्यासाठी चार चौघात शिवीघाळ करत असतो ; त्यावेळी त्याला तेथे उपस्थित असणाऱ्या महिलांमध्ये प्रचंड लज्जा उत्पन्न होते याची सुद्धा फिकीर नसते . जातीवरून शिव्या देणाऱ्या वर 'अँट्रोसिटी ' कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल होतो. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या खासगी भागावरून शिव्या देणाऱ्या वर देखील गुन्हे दाखल केले पाहिजेत. 'शिव्या दिल्या तर याद राखा! ' हा इशारा शिव्या बंदीचा ठराव करणाऱ्या गावांप्रमाणे आता शासनाने देखील ठणकावून दिला पाहिजे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# सण उत्सव साजरे करताना शांतता आणि सामाजिक सलोखा राखावा-उपविभागीय पोलीस अधिकारी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** रामनवमी,रमजान ईद, हनुमान जयंती, महात्मा फुले जयंती, गुढीपाडवा आदी आगामी काळात येणार सण, उत्सव सर्वांनी शातंतेमध्ये साजरे करावेत. सर्वधर्मीय बांधवांनी एकमेकांच्या भावनांचा आदर करीत हे, सण उत्सव साजरे करावेत. या काळात सामाजिक सलोखा, शांतता कायम राखून प्रशासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी केले आहे.

सण ,जयंती उत्सव व रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर पोलीस संकुल पंढरपूर येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रशिक्षणार्थी आयपीएस अंजना कृष्णन, तहसीलदार सचिन लंगुटे, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, तय्यब मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर तालुक्यातील पोलीस पाटील तसेच शहर व तालुक्यातील समाज बांधव उपस्थित होते.



यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले म्हणले पंढरपूर तालुक्यात सर्व जाती-धर्मीय बांधव एकत्र येवून सण, उत्सव साजरे करतात, ही आजपर्यंतची परंपरा आहे. त्यामुळे आजपर्यंत तालुक्यात सामाजिक सलोखा आणि शांतता टिकून असून हीच परंपरा कायम राखणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आगामी काळात साजरे होणारे सण, जयंती उत्सव काळात सर्वांनी नियमांचे पालन करून आणि एकमेकांच्या भावनांचा आदर करून उत्साही वातावरणात साजरे करावेत. सण ,जयंती उत्सवाच्या अनुषंगाने लावण्यात येणारे बॅनर हे स्थानिक प्रशासनाच्या परवानगीने लावण्यात यावेत.तसेच ते वेळेत काढून घ्यावेत. मोबाईलवर आक्षेपार्ह स्टेटस ठेवू नये, तसेच आवाजाच्या मर्यादेचे पालन करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी पोलीस निरिक्षक घोडके म्हणाले सर्व जाती धर्मातील समाज बांधवानी आप आपले सण उत्सव शांततेत व उत्साही वातावरणात साजरे करावेत. सोशल मीडियावरील पोस्टची खात्री केल्याशिवाय ती व्हायरल करू नये. सोशल मीडिया वापरतांना खबरदारी घ्यावी. समाज मन बिघडवणारी अनुचित पोस्ट व्हायरल करणे टाळावे.सोशल मीडियावरील बहुतांश आयडी चुकीच्या असल्याने अशा चुकीच्या आयडीला लाईक किंवा पोस्ट शेअर करू नये. कोणी आक्षेपार्ह पोस्ट ठेवली तर त्याची माहिती पोलिसांना द्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी पंढरपूर तालुक्यात शांतता अबाधित ठेवण्यासाठीच्या उपाययोजना काय व कशा याविषयी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना बैठकीत समाधानकारक उत्तरे दिली.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

बालवाटिका -पायाभूत,
पूर्वतयारी पूर्व माध्यमिक,
माध्यमिक स्थर रचना
बालकाच्या सर्वांगीण विकासाचा टप्पा
जागतिक नागरिक घडवण्याचा मार्ग सोपा ||१||

लक्ष, ध्येय ठरवूया क्षमता,
अध्ययन निष्पत्ती साध्य करूया
क्षेत्र, उपक्षेत्र, मानके लक्षात घेऊया
गुणवत्ता पूर्ण शाळा घडवूया. ||२||

बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक विकास
बालकाचा ३६० डिग्री परिवर्तनाचा ध्यास
स्वयं मूल्यमापन, सहाध्यायी,
पालक, शिक्षक मिळूनी
सारे करूया समग्र प्रगतीपत्रक. ||३||

थोर भारतीय ज्ञान, संस्कृती संगम
तयांचा पंचकोश, पंचपदी राष्ट्रीय शैक्षणिक
धोरण बालकांच्या विकासाचे कोंदण. ||४||

**सौ. सीमा युवराज सोळसकर.**
**संजीवनी विद्यालय,**
**दिघा, नवी मुंबई.**

# भारतातील पहिल्या हिंदू दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, मुंबई :** हिंदूंना हिंदू वर्षाचे महिने, तिथी, सण यांची माहिती व्हावी तसेच या त्यांचे महत्व लक्षात यावे यासाठी 'हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती कुर्ला (पश्चिम)' यांच्या वतीने भारतात पहिल्यांदाच हिंदू मासांच्या अनुसार दिनदर्शिका तयार करण्यात आली असून २३ मार्चला कुर्ला पश्चिम येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण या ठिकाणी 'उत्सव हिंदुत्वाचा, उत्सव कुर्ल्याचा' हा दिनदर्शिकेचा दिमाखदार प्रकाशन सोहळा पार पडला. या सोहळ्याला भारताचार्य प्रा. सु.ग. शेवडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. हिंदू दिनदर्शिकेविषयी बोलताना प्रा. शेवडे गुरुजी म्हणाले कि प्रचलित केलेंडर हीना केवळ कालगणनेसाठी तयार करण्यात येत असून हिंदू पंचांग हे कालयोजनेसाठी आखले जाते. प्रचलित कॅलेंडरमध्ये वर्षाचे ३६५ दिवस १२ महिन्यांत मांडण्यासाठी काही महिने ३० तर काही महिने ३१ दिवसांचे करण्यात आले आहेत ज्याला कोणताही शास्त्रीय आधार नाही. हिंदू मासात मात्र साधारणतः ३० दिवस असतात. यातील प्रत्येक दिवसाचे स्वतंत्र व्यक्तिमत्व आणि महत्व असते. हिंदू कालयोजनेनुसार सिद्ध करण्यात आलेली





दिनदर्शिका ही हिंदूसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. कार्यक्रमाचा आरंभ दीप्रज्वलनाने करण्यात आला.


यावेळी व्यासपीठावर सर्वेश्वर नगरचे संघचालक प्रभाकर परांजपे उपस्थित होते. लोकसहभागातून तयार करण्यात आलेल्या या दिनदर्शिकेकरिता जाहिरात आणि अर्थसहाय्य करणाऱ्या दात्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल आणि सन्म ानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. देशभरात नावलौकिक कमावलेल्या गोरखनाथ महिला गोविंदा पथक या देशातील पहिल्या महिला गोविंदा पथकाचाही यावेळी सत्कार करण्यात आला. हिंदु मासांच्या वैशिष्ट्यपूर्ण नावांची रचना करून व्यासपीठाजवळ भव्य रांगोळी रेखाटण्यात आली होती.. कार्यक्रमाच्या आरंभी राष्ट्र आणि धर्म यांवरील गीतांचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचा आरंभ 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने आणि समारोप संपूर्ण 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताने करण्यात आला. दरवर्षी येणारे सण ख्रिस्ती कॅलेंडरप्रमाणे मागेपुढे होत असतात यामध्ये चूक आपल्या सणांची नसून आपल्या सणांनाच आपण चुकीच्या कॅलेंडरमध्ये गुंतवले आहे त्यामुळे आताच्या पिढीला हिंदू महिन्यांची नावेसुद्धा माहित नाहीत. निदान पुढच्या पिढीला हिंदू महिने, तिथी आणि तिथीनुसार येणारे प्रत्येक सण कोणत्या हिंदू मासात येतात हे कळावे यासाठी यंदा पहिल्यांदाच हिंदू दिनदर्शिकेची संकल्पना राबवण्यात आली असून ही दिनदर्शिका हिंदू नववर्षारंभाच्या निमित्ताने अधिकाधिक घरांत पोहचवावी असे आवाहन हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती कुर्ला (पश्चिम) चे कार्यवाहक किरण दामले यांनी यावेळी केले. सर्वसामान्य लोकांना सहजपणे विकत घेता यावी यासाठी दिनदर्शिकेचे स्वागतमूल्य केवळ २० रु. ठेवण्यात आले असून ज्यांना दिनदर्शिका हव्या आहेत त्यांनी ९०८२४३६५११ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## माथेरानमध्ये वसंत ऋतूत निसर्ग बहरतोय





**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२५, माथेरान :** निसर्ग रम्य माथेरान या थंड हवेच्या पर्यटनस्थळी प्रत्येक ऋतुत निसर्गाची किमया आवर्जून पहायला मिळते. डोळ्याचे पारणे फेडणारा स्वप्नवत स्वर्ग याची डोळी ह्याची क्षणी पाहण्याची संधी आता वसंत ऋतूत माथेरानला अनुभवयास मिळत आहे. शिशिर ऋतूत निसर्ग आपले जुने अवसान झडकून वसंत ऋतुत निसर्गाने मुक्त हस्ते उधळण करायला सुरुवात केली आहे. त्याने पर्यटक नागरिक सुखावले आहेत. रस्त्यावर ठीक ठिकाणी, जंगल परिसरात झाडाचे सुके पाने गळून पडली आहेत. त्यावरून चालताना होणाऱ्या आवाजाने पर्यटक सुखावले आहेत. वसंत ऋतुत निसर्ग बहरल्याने वन्य जीव याचे ह्याच महिन्यात मनोमिलनाचा असतो. मुंगूस, शेकरू, खारुताई, बुलबुल कुत्रुक, पाशा पक्षाचे दर्शन होत असताना पहाटे, सायंकाळी किलबिलाटाने निसर्गाच्या आनंद उत्सवामध्ये माथेरान पर्यटक नागरिकांना वेगळीच पर्वणी अनुभवास मिळत आहे. सध्या परीक्षेचा काळ असल्याने पर्यटकांची गर्दी कमी आहे. परंतु पुढील आठवड्यात. वसंत ऋतुचा निसर्ग रम्य माथेरान पहावयास पर्यटकांची पावले नक्कीच माथेरानकडे वळतील यात शंका नाही.

## फसवणुकीपासून सावधान ! महापालिकेत कोणतीही भरती सुरू नाही




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** महानगरपालिकेमध्ये अधिकारी, कर्मचारी यांची कोणतीही भरती सुरू नाही. तरीही तशा प्रकारच्या खोट्या जाहिराती, सूचना प्रसारित करण्यात येत असल्याची माहिती प्राप्त झालेली आहे. त्याचप्रमाणे काही जणांना महानगरपालिकेचे खोटे लेटरहेड वापरून त्यावर महानगरपालिकेचे बोधचिन्ह व खोटा शिक्का वापरून नियुक्ती करण्यात येत असल्याचे पत्र देखील प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत संबंधित उमेदवारांकडून पोलीस विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आलेली असून नवी मुंबई महानगर पालिकेकडून सुद्धा पोलीस विभागाकडे रीतसर तक्रार करण्यात आलेली आहे.

वास्तविकत: नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये सध्या कोणत्याही पदासाठीची भरती प्रक्रिया सुरू नाही. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या माहितीला अथवा जाहिरातींना बळी पडू नये व प्रतिसाद देऊ नये. तसेच संभाव्य आर्थिक नुकसान टाळावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमधील भरती किंवा कोणत्याही अधिकृत माहितीसाठी नागरिकांनी महानगरपालिकेची वेबसाईट https://www.nmmc.gov.in यावर तसेच महानगरपालिकेच्या अधिकृत फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम पेजला भेट द्यावी असे आवाहन नमुंमपा प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

## विधानपरिषद विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांचा बुलडाणा जिल्हा दौरा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, बुलडाणा :** महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेता अंबादास दानवे हे गुरुवार, दिनांक २७ मार्च २०२५ रोजी बुलडाणा जिल्हा दौरावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

– गुरुवार, दि. २७ मार्च रोजी सकाळी ९ वाजता शिवनी आरमाळ ता.देऊळगाव राजा येथे आगमन व पुरस्कार प्राप्त युवा शेतकरी स्व.कैलास अर्जुनराव नागरे यांच्या कुंटुबियास सांत्वनपर भेट. सकाळी ९.३० वाजता शिवनी आरमाळ येथुन देऊळगाव राजा-जाफ्राबाद-सिल्लोड भराडी मार्गे पिशोरकडे प्रयाण करतील.

## बोधी मीडियाच्या वतीने मोर्चकरांना पाणी बॉटल वाटप




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२५, नांदेड :** बुद्धांचे पवित्र स्थळ असलेल्या बिहार राज्यातील बुद्धगया महाबोधी विहारांना बौद्धांच्या ताब्यात द्या. १९४९ चा कायदा रद्द करा या मागणीसाठी जिल्हाभरातील बौद्ध बांधवांच्या वतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चामध्ये ग्रामीण भागातील व शहरी भागातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. भर उन्हात ही हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला हा मोर्चा कलामंदिर वजीराबाद या ठिकाणी आला असता, बोधी मीडियाच्या वतीने महिला-पुरुषांना पाणी बॉटल वाटप करून एक चांगला उपक्रम राबवण्यात आला. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे अनेकांना पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे मोर्चातील महिला पुरुष व लहान मुलांनाही भर उन्हात चालत मोर्चामध्ये सहभागी व्हावं लागत आहे. त्यामुळे अनेकांना पाण्याची गरज भासते.

त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील बोधी मीडियाच्या वतीने कला मंदिर भागामध्ये एक भव्य स्टॉल उभा करून त्या ठिकाणी शुद्ध पाणी बॉटल मोर्चकरांना वाटप करण्यात आले. यावेळी बोधी मीडिया ग्रूपचे विजय निलंगेकर,अनिल कसबे, प्रल्हाद लोहेकर, संभाजी सोनकांबळे, प्रल्हाद कांबळे, प्रशांत गवळे, अनुराग पवळे. बालाजी वैजाळे, अविनाश पाटील, अविनाश पाईकराव, प्रवीण खंदारे, राम तरटे, जयपाल वाघमारे, अंकुश सोनसळे, महेंद्र गायकवाड. देवानंद हिंगोले, राहुल साळवे, गंगाधर गच्चे, दीपक बावस्कर. कुलदीपक नंदुरकर, गंगाधर सूर्यवंशी, नकुल जैन. शेख मौला, रफिक शेख, माधव गोधने, जयवर्धन भोसीकर, श्याम कांबळे, अशोक काकांडीकर, श्रीराम मोटरगे, प्रदीप घुगे, ज्ञानेश्वर लोंढे, कमलाकर बिराजदार, कंथक सूर्यतळ, संघरत्न पवार, सुनील कांबळे, किरण कांबळे, आनंद सोनटक्के, आदी पत्रकारांची यावेळी उपस्थिती होती.

# धरणातील गाळ काढण्याच्या कामास प्राधान्य द्या - जिल्हाधिकारी यांचे निर्देश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, बुलडाणा :** संपूर्ण राज्यात पाणी आडवा, पाणी जिरवा या योजनेंतर्गत जलसंधारणाच्या कामाला सर्वत्र सुरुवात झालेली आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात असणारे धरण, नद्या नाले यांचे सर्वेचे काम पूर्ण करण्यात आले असून यातील गाळ काढण्याच्या कामास प्रथम प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. महाराष्ट्राला पाणीटंचाईपासून मुक्त करण्यासाठी व सुजलाम सुफलाम होण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात 'पाणी आडवा पाणी जिरवा ही योजना युद्ध पातळीवर कार्यान्वित करण्यात आलेली असून यासाठी वेगळ्या निधीची राज्य शासनाने अर्थसंकल्पात तरतूद करून ठेवली आहे. यासाठी महाराष्ट्र शासन व भारतीय जैन संघटना यांच्यामध्ये सामंजस्य करार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उपस्थितीत मुंबई येथे करण्यात आल्यानंतर मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने ठीक ठिकाणाचे धरणातील गाळ काढण्यासाठी आराखडे तयार करण्यात येत असून लहान मोठी धरणे, नद्या, नाले यातील गाळ काढून सिंचन क्षमता वाढवण्याचा उद्देश ठेवण्यात आलेला आहे.

जिल्ह्यामध्ये सद्यास्थितीत विविध १०९ लहान मोठ्या धरणातील गाळ काढण्याचे निश्चिती केली असून प्रत्यक्षात ३२ कामांचे कार्यारंभ आदेश एजन्सीला देण्यात आलेले आहे. उर्वरित कामाचे कार्यारंभ आदेश तात्काळ देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिले. तसेच जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी गाळ काढणे अपेक्षित आहे.

अशा ग्रामपंचायतीची माहिती मृद व जलसंधारण विभाग व भारतीय संघटनेचे पदाधिकारी यांना देण्याबाबतचे आवाहन डॉ. किरण पाटील यांनी केले. यावेळी बीजेएस चे राज्य कार्यकारणी सदस्य सन्मती जैन सुजलाम सुफलामचे माजी अध्यक्ष राजेश देशलहरा, पश्चिम विदर्भ अध्यक्ष कीर्तीकुमार वायकोस, जिल्हाध्यक्ष मंगलचंद कोठारी, सुजलाम सुफलामचे जिल्हाध्यक्ष विनोद कुमार सुराणा, देऊळगाव राजाचे शहराध्यक्ष पियुष खडकपूरकर मुन्ना बेगानी उपस्थित होते.

# स्मार्त-भागवत एकादशी



वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसर्या दिवशी उपवास सोडला जातो. स्मार्त आणि भागवत एकादशी असे दोन भेद सांगितले आहे. ज्या पक्षात हे दोन भेद येतात. त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी स्मार्त व दुसर्या दिवशी भागवत, असे लिहिलेले असते. अनेकदा एका पक्षात स्मार्त आणि भागवत, अशा एका पाठोपाठ दोन एकादशी असतात. यातील पहिल्या येणाऱ्या एकादशीला स्मार्त नाव असते. परंतु, भागवत एकादशीला नाव नसते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा कशा पद्धतीने करावी तसेच एकादशीचे नेमकं महत्त्व काय याविषयी जाणून घेऊयात पूजाविधी – वारकरी संप्रादयामध्ये परंपरेने भागवत एकादशी साजरी केली जाते.

या एकादशीच्या दिवशी भगवान विष्णुंची पूजा करून विष्णू भक्त दिवसभर उपवास करतात. भागवत एकादशी व्रत हे पूर्ण नियम, श्रद्धा व विश्वासाने केले जाते. या व्रताच्या प्रभावामुळे मोक्ष प्राप्ती होते. या व्रतामुळे अश्वमेध यज्ञ, घोर तपस्या, तीर्थ स्नान व दान या सर्वांपासून मिळणाऱ्या पुण्यापेक्षाही जास्त पुण्य मिळते, असे पौराणिक कथेत म्हटले आहे. महत्त्व- वारकरी संप्रदायामध्ये एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा आणि आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात.

विष्णुभक्तांसाठी एकादशी हे व्रत म्हणजे एक पर्वणीच असते. त्यामुळे ते नेमाने सर्व एकादशी करतात. ज्यांना उपास करणे शक्य नसते, ते भगवान विष्णूची पूजा करतात. तसेच साधा सात्त्विक आहार घेतात. ॐ नमो भगवते वासुदेवाय नम:।। या मंत्राचा जप करतात. अथवा विष्णुसहस्त्रनामाचे श्रवण-पठण करतात. मात्र जेव्हा एखादी तिथी विभागून येते आणि दिनदर्शिकेत दोन दिवसांवर एकाच तिथीचा दोनदा उल्लेख येतो तेव्हा काही भाविकांचा गोंधळ होतो. जसे की स्मार्त आणि भागवत एकादशी! मागील ९ डिसेंबर रोजी आलेल्या उत्पत्ती एकादशीला ही आणखी दोन नावे का? हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल तर ही माहिती तुमच्यासाठी! उत्पत्ती एकादशी: सर्व व्रतांमध्ये एकादशीच्या व्रताचे विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की या व्रताच्या प्रभावाने वर्तमानासह मागील जन्माची पापे नष्ट होतात. यासोबतच अनेक पिढ्यांतील पितरांना मोक्ष प्राप्त होतो. ज्यांना एकादशीचा उपवास सुरू करायचा आहे ते उत्पत्ती एकादशीपासून हे व्रत सुरु करू शकतात. या एकादशीच्या तिथीला देवीचा जन्म झाला म्हणून तिला उत्पन्ना तसेच उत्पत्ती एकादशी असेही म्हणतात. जाणून घेऊ एकादशीचे महत्त्व आणि कथा.

मग स्मार्त एकादशी म्हणजे काय? तर दशमी संपून एकादशी सुरू होताना त्या तिथीने सूर्योदय पाहिला नाही पण तो दिवस नव्या तिथीच्या नावे सुरू झाला असेल तर त्याला स्मार्त तसेच दर्श असा उल्लेख केला जातो. म्हणजे तिथी सुरू झाली पण तिथीशी संबंधित व्रत सूर्योदय पाहिलेल्या दिवशीच करायचे यासंबंधी ती सूचना असते. म्हणून ती स्मार्त एकादशी! भागवत एकादशी: जी तिथी सूर्योदय पाहते ती तिथी आपल्याकडे ग्राह्य धरली जाते. म्हणजेच एकादशी तिथी आदल्या दिवशी सुरू झालेली असली तरी तिने जर दुसऱ्या दिवशीचा सूर्योदय पाहिला असेल तर ती तिथी पाळली जाते आणि दिनदर्शिकेवर देखील सूर्योदय पाहिलेल्या तिथीवर भागवत धर्माचे ध्वजचिन्ह दिसून येते.

भागवत धर्म पाळणारे वारकरी बांधव त्यालाच भागवत एकादशी म्हणतात. वैष्णव उदय तिथी मानतात. स्मार्त वाले जिथून तिथी सुरू झाली ती तिथी मानतात आणि व्रत सुरु करतात. हा तो फरक.

स्मार्त म्हणजे जे लोक वेंदांवर, श्रुती स्मृती, पुराण यांना प्रमाण मानतात, ज्यांना वैदिक धर्माचं ज्ञान आहे, ते स्मार्त एकादशी पाळतात. थोडक्यात ऋषी, मुनी तसेच कर्मकांड करणारे योगी स्मार्त एकादशी करतात. तर वैष्णव म्हणजे जे विष्णू भक्त आहेत, संसारी आहेत, जे सूर्योदय पाहणारी तिथी ग्राह्य धरतात ते भागवत एकादशीचे व्रत करतात. म्हणून विष्णू भक्तांनी स्मार्त एकादशीला विष्णू पूजा करावी मात्र एकादशी व्रताचे पालन भागवत एकादशीला करावे, असे शास्त्र सांगते. भगवान विष्णूंना प्रसन्न करण्यासाठी भागवत एकादशी व्रत केले जाते.

वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसर्या दिवशी उपवास सोडला जातो. एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा व आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात. अशी मान्यता आहे.

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**गडचिरोली**

# नागपूर हिंसाचारातील आरोपी फहीम खानच्या घरावर अखेर बुलडोझर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नागपूर :** उत्तर प्रदेशातील बुलडोझर कारवाईची देशभरात मोठी चर्चा झाली. गेल्या वर्षभरात उत्तर प्रदेशातील अनेक भागांमध्ये बुलडोझर कारवाई करण्यात आल्याने विरोधकांकडून योगी आदित्यनाथ यांच्यावर 'बुलडोझरराज' अशी टीका केली जाते. दरम्यान नागपूर हिंसाचाराच्या घटनेनंतर अशीच एक घटना समोर आली आहे.

नागपूर हिंसाचारातील आरोपी फहीम खान याच्या घरावर आज सकाळी बुलडोझर चालवण्यात आला. यशोधरानगरच्या संजय बाग कॉलनीत राहणारा फहीम खान याने घर बांधताना मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केल्याने मनपा प्रशासनाकडून त्याला नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर आज त्याच्या घरावर बुलडोझर चालवून ही कारवाई करण्यात आली. फहीम खानचे कुटुंबीय काल २३ मार्चलाच घर सोडून गेल्याची माहिती आहे.

**फहीम खानवर काय आहे आरोप?**

नागपूर हिंसाचारासंदर्भातील पोलिसांच्या एफआयआरमधून फहीम शमीम खान हाच हिंसाचाराचा मुख्य सूत्रधार असल्याचं समोर आलं आहे. फहीम खान हा मायनॉरिटी डेमॉक्रॅटीक पक्षायचा शहराध्यक्ष आहे. नागपूरमधील हिंसाच्याराच्या घटनेप्रकरणी पोलिसांनी ५१ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. फहीम शमीम खानच्या नेतृत्वात हे सगळं झाल्याचं एफआयआरमध्ये म्हटलं आहे. सोमवारी सगळी बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेबाज प्रतिकात्मक पुतळा जाळून आंदोलन केले. त्याबाबत फहीम खाने याने ४०-५० जणांना बेकायदेशीपणे जमा केले, असा त्याच्यावर आरोप आहे. फहीद खाने याने मुस्लीम धर्मांच्या लोकांना संध्याकाळी ४ वाजेच्या सुमारास एकत्र जमवून धार्मिक वाद निर्माण होईल ह्या उद्देशाने कट रचला. जवळपास ५०० ते ६०० मुस्लीम लोक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक येथे जमा झाले. पोलिसांना सर्वांना जमा न होता आपापल्या घरी सुरक्षितरित्या निघून जावे असे आवाहन केले.

मात्र जमावातील कुणीही काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते, त्यावेळी जमलेला जमाव एकमेकांना दंगा करण्याची चिथावणी देत मोठमोठ्याने घोषणा देऊ लागले. 'अभी पुलीस को दिखाते है. इनको और किसी भी हिंदू को छोडने का नही. इन्होने ही सारा खेल किया है. इन्होनेही ये सब किया है.' अशी धमकी पोलिसांसमोर जमावाने दिली. त्यानंतर जमाव अधिक प्रक्षोभित झाला.

# मनसेच्या नेतृत्वाखाली वाशी मध्ये भव्य मानवी साखळी आंदोलन

**अक्षराज : गणेश भवार**

**दि.२५, (वाशी) नवी मुंबई** : ऑक्टोबर २०२४ मध्ये सिडकोने नवी मुंबई परिसरात २६ हजार घरांची लॉटरी जाहीर केली. जाहिरातीत ही घरे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत सांगून घरांच्या किंमती सर्व सामन्यांच्या आवाक्या बाहेर ठेवल्या आहेत. याला विरोध म्हणून मनसे प्रवक्ते व नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २५ मार्च २०२५ रोजी वाशी येथे भव्य मानवी साखळी आंदोलन करण्यात आले. हजारोंच्या संख्येने सिडको सोडतधारक मानवी साखळी आंदोलनात सहभागी झाले.

वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास वंदन करून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. यावेळी सिडकोच्या प्रतिमेस लोखंडी साखळदंडाने बांधून प्रतिकात्मक निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अरेंजा कॉर्नर असा पायी मोर्चा काढण्यात आला. नंतर अरेंजा कॉर्नर येथे सिडको सोडतधारकांनी भव्य मानवी साखळी उभी करून सिडको चा निषेध केला. कमी करा कमी करा, सिडकोच्या घरांची किंमत कमी करा, माझ्या पसंतीचे सिडकोचे घर, जाहिरात केली दुनियाभर, तुम्ही म्हणता नवी मुंबईचे प्रवेशद्वार, किंमत पाहून झाले सर्व गप्पगार, आमच्या स्वप्नातील घर, घेईल परवडणार असेल तर, लढा सिडकोच्या घरांचा, ध्येय किंमत कमी करण्याचा, स्वस्त घरांची दाखवली आशा, किंमती वाढवून केली निराशा, गरिबांच्या स्वप्नाचा केला चुराडा, येतोय आम्ही सिडको वर करण्या राडा अशा घोषणांचे




फलक हातामध्ये पकडून महिला, पुरुष, ज्येष्ठ सिडको सोडत धारकांनी सिडको प्रशासनाचा निषेध केला. भर उन्हात हजारोंच्या संख्येने साखळी आंदोलनात सहभागी होऊन सिडको सोडत धारकांनी मुजोर सिडको विरुद्ध आज एल्गार पुकारला.

सिडको ने दर जाहीर करण्या पूर्वी १ लाख ५२ हजार अर्ज आलेला असताना दर जाहीर झाल्या नंतर फक्त २२ हजार अर्ज उरलेत. त्यातील पण जवळपास ६-७ हजार सोडतधारकांना घरे जबरदस्ती माथी मारली आहेत. सिडकोने ७०० कोटी खर्च करून ज्या मार्केटिंग कंपनीशी करार केला होता ते पैसे घरांच्या किंमती कमी करण्यासाठी वापरले असते तर गोर गरिबांचे आशीर्वाद मिळाले असते अशी भावना काही सिडको सोडतधारकांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे सिडकोने जाहिरात करताना ३२२ चौ फुटाचे घर सांगून प्रत्यक्षात २९० चौ फुटाचे घर देऊन सर्व सामान्य सिडको सोडत धारकांची फसवणूक केली आहे.

सिडकोने या घरांचे दर ठरवताना अनेक पातळीवर सर्वसामान्यांची व केंद्र सरकारची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला. केंद्र सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये पंतप्रधान आवास योजनेची मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. त्यानुसार आर्थिक दृष्ट्या दुर्बल (एथड) घटकांची उत्पन्न मर्यादा ३ लाख पेक्षा कमी तर अल्प उत्पन्न गट (ड्खत्रः) या घटकाची मर्यादा ३ लाख ते ६ लाख असायला हवी. हे नियम नरेंद्र मोदींच्या गुजरात मधील अहमदाबाद मध्ये पाळले जातात मग नवी मुंबई याला अपवाद का ? त्याच प्रमाणे विधानसभा निवडणुकी पूर्वी सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांनी आश्वासन दिले होते की, घरांच्या किंमती २०% ते २५% नी कमी होतील. या घोषणेचा ही मंत्री महोदयांना विसर पडल्याचे दिसून येते.

कुर्ला मध्ये म्हाडा जवळपास ५०० चौ फुटाचे घर ५० लाखाला देत असताना सिडको नवी मुंबईत ३०० चौ फुटाचे घर ८० लाखाला का देत आहे ? असा सवाल उपस्थित करत ही सर्व सामान्यांची घोर फसवणूक आहे असा आरोप गजानन काळे यांनी सिडको प्रशासनावर केला. पुढील निर्णय होई पर्यंत सिडकोने पैसे भरायची प्रक्रिया थांबवावी अशी मागणी सुद्धा या आंदोलनावेळी सिडको प्रशासनाला केली. येत्या काही दिवसांत सिडको प्रशासनाला सोडतधारकां तर्फे पोस्ट कार्ड पाठवण्याची मोहीम सुरू करणार. तसेच आवश्यकता पडल्यास सिडको सोडत धारक 'जेल भरो' आंदोलन करतील अशी माहिती गजानन काळे यांनी दिली.

या मोहिमेत सिडको सोडतधारक आपल्या भावना प्रशासनाला व सरकारला कळवतील. तसेच येत्या काही दिवसात जर घरांचे दर कमी नाही झाले तर सिडको भवन वर भव्य 'इंजेक्शन मोर्चा' काढण्यात येईल अशी घोषणा गजानन काळे यांनी आज केली.

या मोर्चात उप शहरअध्यक्ष सविनय म्हात्रे, शहर सचिव विलास घोणे, सचिन कदम, महिला सेना शहर अध्यक्ष डॉ. आरती धुमाळ, उप शहर अध्यक्ष अनिथा नायडू, शहर सचिव यशोदा खेडसकर, विभाग अध्यक्ष अभिलेश दंडवते, सागर विचारे, शाम ढमाले, विकास पाटील, अक्षय भोसले, विद्यार्थी सेना शहर अध्यक्ष संदेश डोंगरे, रोजगार शहर संघटक सनप्रीत तुर्मेकर, चित्रपट सेना शहर संघटक अनिकेत पाटील, संजय शिर्के, कृष्णा कांबळे, संतोष मोटे, महिला सेना विभाग अध्यक्ष संगीता वंजारी, विद्या इनामदार, नंदा मोरे व सिडको सोडतधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात

## शिल्पा बन्सोड यांना महापौर पुरस्कार




**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२५, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिके द्वारे दिल्या जाणाऱ्या व अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणाऱ्या महापौर आदर्श शिक्षक पुरस्काराचा नुकताच आण्णाभाऊ साठे सभागृहात वितरण सोहळा संपन्न झाला. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लिंबूणीबाग मराठी शाळेच्या चित्रकला शिक्षिका शिल्पा बन्सोड यांना महापालिकेचे अति.आयुक्त अमित सैनी, शिक्षण उपायुक्त डॉ प्राची जांभेकर, आणि शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांच्या शुभहस्ते या वर्षीचा महापौर आदर्श शिक्षक देऊन गौरविण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत दरवर्षी पन्नास शिक्षकांना महापौर आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. त्यात महापालिका शाळेच्या उत्कृष्ट काम करणाऱ्या प्राथमिक विभागाच्या चाळीस तर माध्यमिक विभागाच्या दहा शिक्षकांना सन्मानित करण्यात येते. या वर्षी ज्या पन्नास शिक्षकांना महापौर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात एम पूर्व-१ या विभागातील लिंबोणीबाग मराठी शाळा क्रमांक १ येथे कार्यरत असलेल्या व आपल्या कार्यकुशलतेने ननावलौकिक कमावलेल्या चित्रकला शिक्षिका शिल्पा बन्सोड यांचाही समावेश आहे.उच्च शिक्षित असलेल्या शिल्पा बन्सोड यांची महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात एकूण सतरा वर्षे सेवा पूर्ण झाली असून त्यांनी आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना चित्रकलेचे मार्गदर्शन करून अनेकाना चित्रकार, आर्किटेक्चर बनण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या एलिमेंट्री, इंटमिजीएट ग्रेड परीक्षेत त्यानी मार्गदर्शन केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी चांगले ग्रेड मिळवून आपले नावलौकिक केले आहे. शिल्पा बन्सोड यांच्या कामाची दखल घेऊन मुंबईतील अनेक नामांकित संस्थांनी त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केलेले आहे.

यावेळी अकरा हजार रुपयांचा धनादेश, आकर्षक ट्रॉफी, मेडल आणि शॉल व पुष्पगुच्छ देऊन शिल्पा बन्सोड यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीला महापौर पुरस्काराच्या माध्यमातून मिळालेल्या कौतुकाबद्दल शिल्पा बन्सोड यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## छत्रपती संभाजीनगर : अतिक्रमण हटाव पथकावर दगडफेक




**दि.२५, छ.संभाजीनगर :** शहरातील हर्सूल येथील गटनंबर २१६ आणि २१७ मधील गायरान जमीनीवरील अतिक्रमण सोमवारी हटविताना अतिक्रमण पथकावर जमावाकडून दगडफेक करण्यात आली. यामध्ये महापालिकेचे दोन कर्मचारी जखमी झाले. हर्सूल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

हर्सूल येथे प्रधानमंत्री घरकूल प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी गटनंबर २१६ आणि २१७ मधील अडीच एकर जागा लागणार आहे. या जागेवर अतिक्रमण करून १८० जणांनी घरे थाटली होती. हे अतिक्रमण हटविण्यासाठी मनपाकडून वारंवार प्रयत्न केले जाते होते. परंतु, अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण काढून घेण्यास नकार दिला. त्यामुळे मनपाच्या अधिकार्यांनी अतिक्रमण काढून घेण्यासाठी पाच दिवसाचा वेळ दिला. या पाच दिवसातही अतिक्रमणधारकांनी प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर मनपाच्या अतिक्रमण विभागाने सोमवारी धडक कारवाई करीत १८० घरांचे अतिक्रमण जमीनदोस्त केले. यावेळी अतिक्रमणधारकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. परंतु, नागरी मित्र पथकाने समजावून सांगितल्यानंतर त्यांचा विरोध मावळला.

या संदर्भात माहिती देताना नागरी मित्र पथकप्रमुख प्रमोद जाधव म्हणाले की, आज मंगळवारी सकाळी ११.३० वाजता मनपाचे अतिक्रमण पथक आश्विनी कोथलकर यांच्या नेतृत्वाखाली हर्सूलचे अतिक्रमण हटविण्यात आले त्या ठिकाणी पोहचले. ध्वनीक्षेपकावरून तेथील नागरिकांना तुमचे साहित्य काढून घ्यावे, जागेचे सपाटीकरण करायचे आहे, असे आवाहन करीत होते. त्या वेळी जमावाने आरडाओरड करीत धावत येत या पथकावर दगडफेक करण्यास सुरुवात केली. अतिक्रमण पथकातील माजी सैनिक गजानन चितळे यांचे डोके फुटले तर रामेश्वर निकम यांच्या पायाला मार लागला.

# टीबी मुक्त जिल्हा करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहा - जिल्हाधिकारी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, ठाणे :** इ.स. १८८२ साली डॉ.रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला. त्यांचा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञाच्या परिषदेत मांडला व त्यास दिनांक २४ मार्च मान्यता मिळवली म्हणून २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दुरीकरणाकरिता विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात.

त्याअनुषंगाने जिल्हा क्षयरोग केंद्र, ठाणे कार्यालय अंतर्गत दिनांक २४ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली टीबी मुक्त ग्राम पंचायत अभियान अंतर्गत टीबी मुक्त ग्रामपंचायती म्हणुन निवड करण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या निर्देशांकानुसार व सहसंचालक आरोग्य सेवा, क्षय व कुष्ठ पुणे यांचे मार्गदर्शक तत्वानुसार एकूण २८ रोप्य प्रशस्तीपत्र देऊन ग्राम पंचायतींना महात्मा गांधी यांचा पुतळा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या शुभ हस्ते देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच १२ निक्षय मित्र व ४ टीबी चॅम्पीयन यांना देखील प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. याप्रसंगी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी ठाणे जिल्हातील एकूण ग्रामपंचायतीमधील २८ कास्य व १३६ रोप्य मानांकन देऊन पुढील वर्षी उर्वरित सर्व ग्रामपंचायती ह्या लवकरच सिल्वर मधून सुवर्ण नामांकन प्राप्त करण्यास प्रयत्न करून ठाणे जिल्ह्यात क्षयरोग हद्दपार करूयात, असे आवाहन केले.

हा कार्यक्रम जिल्हा क्षयरोग केंद्र कार्यालय व जीएलआरए इंडिया (जर्मन लेप्रसी एन्ड टीबी रिलीफ असोसिएशन ऑफ इंडिया) या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये एन.के.टी. माध्यमिक ज्युनिअर महाविद्यालयातील २५० मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच नर्सिंग टी एन.के.टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची टीबी विषयक चित्रकला, रांगोळीच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच टीबी जनजागृती करिता पथनाट्य नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे यांच्या समोर सादर केला.




जागतिक क्षयरोग दिन नियोजन भवन सभागृह येथे संपन्न झाला असून नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थिनींची क्षयरोग विषयी विविध जनजागृती रॅली आयोजित करून विद्यार्थी रॅली, पथनाट्य, ऑटो मायकिंग, चित्रकला व रांगोळी स्पर्धा, विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर असे विविध उमक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून कार्यक्रम सुरु करण्यात आले असून कार्यक्रमाची प्रास्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.आशा मुंजाळ यांनी केली. केंद्र शासनाच्या टीबी मुक्त ग्रामपंचायत निर्देशांकानुसार निवड झालेल्या ग्रामपंचायतींचा गौरव सोहळा मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उपसंचालक आरोग्य सेवा डॉ.अशोक नांदापूरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, नगराध्यक्ष सुमती पाटील, नगरसेवक किरण भोईर, संत क्लरेट आश्रम बेंडशीळ ता.अंबरनाथ रामभाऊ पातकर, नगराध्यक्ष बदलापुर व निक्षय मित्र, तालुका आरोग्य अधिकारी सर्व, गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक, आशा सेविका, निक्षय मित्र, टीबी चॅम्पीयन तसेच कार्यक्षेत्रातील सर्व क्षयरोग कर्मचारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैद्यकीय अधिकारी डॉ.तरुलता धानके यांनी केले.

# मालवाहू वाहन चालकाची लूट, चार जणांना अटक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नाशिक :** शहरातील अमरधाम रस्ता भागात टोळक्याने मालवाहू वाहन अडवून चाकुचा धाक दाखवत चालकास लुटले. त्याच्या खिशातील अडीच हजार रुपये बळजबरीने काढून पलायन केले. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. याबाबत भूषण चौधरी (४४, रविवार कारंजा ) यांनी तक्रार दिली. सुरमा उर्फ शाहरुख शहा (नानावली), साबीर शहा (सादिकनगर, वडाळा), आवेश खान आणि असलम खान (दोघे नानावली) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. चौधरी सोमवारी मालवाहतूक करणारे वाहन घेऊन जुन्या नाशिक भागात गेले होते. नानावलीतील गुलशाबाबा दर्गा परिसरातून ते अमरधाम रस्त्याकडे जात असताना टोळक्याने वाहन रोखले. चाकुचा धाक दाखवत खिशातील अडीच हजाराची रोकड बळजबरीने काढून पलायन केले. पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे अनेक लुटमारीच्या घटना उघडकीस येण्याची शक्यता आहे. या प्रकरणी भद्रकाली पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**शालेय विद्यार्थिनीचा विनयभंग**

नेहरू गार्डन भागात रिक्षातून आलेल्या टवाळखोरांनी शाळेतून घरी परतणाऱ्या १४ वर्षाच्या मुलीची वाट रोखत विनयभंग केला. पीडित मुलगी सोमवारी दुपारी शाळेतून नातेवाईकांच्या घराकडे पायी निघाली होती. रिक्षातून




आलेल्या दोघांनी तिचा पाठलाग केला. नेहरू गार्डन परिसरात वाट अडवून एकाने तिच्याकडून पेन घेऊन भ्रमणध्वनी क्रमांक असलेली चिठ्ठी तिला देण्याचा प्रयत्न केला. पीडितेने चिठ्ठी घेण्यास नकार दिल्याने रिक्षातील दुसऱ्या संशयिताने भ्रमणध्वनीत मुलीचे छायाचित्र काढले. ही बाब मुलीने पालकांसह शिक्षकांकडे कथन केल्याने हा प्रकार पोलिसात पोहचला. या प्रकरणी भद्रकाली पोलीस ठाण्यात विनयभंग व पोस्को कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**बस स्थानकात सोनसाखळी लंपास...**

मुंबई नाका भागातील महामार्ग स्थानकात बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशाच्या गळ्यातील सोनसाखळी चोरट्यांनी लंपास केली. अर्जुन वाघचौरे (दत्तचौक, सिडको) यांनी तक्रार दिली. वाघचौरे दाम्पत्य कल्याण येथे जाण्यासाठी महामार्ग स्थानकात गेले होते. नाशिक-कल्याण बसमध्ये चढत असताना गर्दीची संधी साधत चोरट्यांनी वाघचौरे यांच्या गळ्यातील सोन्याचा गोफ लांबविला. या प्रकरणी मुंबईनाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पनवेल महापालिकेची ३८२ कोटींची करवसुली

**दि.२५, पनवेल :** पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे सात दिवस शिल्लक राहिले आहेत. यंदाच्या आर्थिक वर्षात सोमवार अखेरपर्यंत ३८२ कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात पालिकेला यश आले. पालिकेने यंदा ५०० कोटी रुपये थकीत कर जमा करण्याचे उद्दिष्ट आखले आहे. सोमवारी एकाच दिवसात पाच कोटी रुपयांचा भरणा करदात्यांनी केला आहे. महापालिका आयुक्तांनी करदात्यांना मालमत्ता कर लवकरात लवकर भरण्याचे आवाहन केले आहे.

पनवेल पालिका क्षेत्रात ३,६२,६४८ करदाते आहेत. त्यापैकी आतापर्यंत ९७,१२५ करदात्यांनी त्यांचा ३८२ कोटी ३१ लाख रुपये पालिकेत सोमवार अखेरपर्यंत जमा केला. अजूनही १८०० कोटी रुपयांचा थकीत कर जमा करणे हे पालिकेसमोर आव्हान बनले आहे. मालमत्ता कर भरण्यासाठी ३१ मार्च ही आर्थिक वर्ष संपण्याची शेवटची तारीख असल्यामुळे शनिवार व रविवारी सुट्टीच्या दिवशी सुद्धा पालिकेची कार्यालये खुली असणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने पनवेल महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिली नसल्यामुळे आणि पुढील आर्थिक वर्षाची दोन टक्के शास्ती वाचविण्यासाठी मार्चअखेरपूर्वी कर भरण्याचे आवाहन पालिकेने केले आहे.